त्वरित

जा.क्र.प्रा/प्राशि/मान्यता/पीआर-
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे -१ यांचे कार्यालय.
दिनांक : 4 SEP 1985

प्रति,

शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे ११
[प्राथमिक विभाग]

विषय:- सन १९८४-८५ या शैक्षणिक वर्षात [जून १९८४ पासून] खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत......
इंग्रजी माध्यमाच्या प्राथ. शाळेस परवानगी.

संदर्भ :- शासनाकडील, शिक्षण व सेवायोजन विभाग, पत्र क्र. डीएलएस-१०८५/(१०३५)/प्राशि-१ ..... दिनांक २०.५.८५ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपले कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भित पत्र कृपया अवलोकावे.

२/- या बाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद म्हणून खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून नेहमीच्या विहीत अटींवर तसेच खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर खाजगी प्राथमिक शाळा जून १९८४ पासून सुरु करण्यास विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव | शाळेचे नाव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी १२१३, सदाशिव पेठ, पुणे ३० | [illegible] मंदिर, डेक्कन जिमखाना, पुणे ४ | पहिली ते चौथी | इंग्रजी. |

१] संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिजे.

२] संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहित केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार किमान प्रशिक्षित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

३] संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे [उदा: वर्गातील विद्यार्थी संख्या, विद्यार्थी प्रवेश इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

४/- संस्थेने जवळपासच्या शाळेवर आगामी शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.

३/- ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करून घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त, अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदली आहे.

२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारची गैरव्यवहार चालत असल्या बाबत तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

४/- तरी या बाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

स्थळ प्रतीवर शि.उप संचालक
यांची सही असे.

दक्षायवार
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे - १ करिता

प्रत प्रशासनाधिकारी / महानगरपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे.५ ........ जिल्हा ..पुणे......... यांना माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत मा. सचिव / अध्यक्ष महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी..१२१४-१२१५ सदाशिव पेठ ...पुणे ४११०३०.............................................
यांना माहितीसाठी अग्रेषित.

TRUE COPY

Hlogah

REGISTRAR,
Maharashtra Education Society
POONA-411 030